# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

4था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई–21

जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा–2/जा.वै./350/126 दिनांक : 8/1/1999 (5)

**// तांत्रिक परिपत्रक //–99.3**

विषय :– पाणी पुरवठा योजनांसाठी मे. इन्स्ट्रॉनिक्स, सांगली यांनी उत्पादित केलेले सॉफ्ट स्टार्टर्स वापरण्यास मान्यता.

पाणी पुरवठा योजनांच्या उपसा यंत्रासाठी प्रचलित ऑटो ट्रान्सफॉर्मर स्टार्टस ऐवजी आधुनिक प्रकारचे सॉफ्ट स्टार्टर्स प्रायोगिक तत्वावर वापरण्यात आले असता मे.इन्स्ट्रॉनिक्स 416416 इ–13 एम.आय. डी.सी. कुपराड, सांगली यांनी उत्पादित केलेले सॉफ्ट स्टार्ट स्टार्टर्स समाधानकारक रित्या काम करीत असल्याचे आढळले आहे व हे स्टार्टर्स अन्य योजनांसाठीही वापरावेत अशी शीफारस अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) यांनी केली आहे.

त्यांची ही शिफारस स्वीकारण्यात येत असून मे.इन्स्ट्रॉनिक्स, सांगली यांनी उत्पादित केलेले सॉफ्ट स्टार्ट स्टार्टर्स पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यकतेनुसार ऑटो ट्रान्सफार्मर स्टार्टर्स (प्रोटेक्शन रिले सह )ला समतुल्य पर्याय म्हणून वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे. निविदा स्पेशीफीकेशन मध्ये 40 अश्वशक्ती व त्यापेक्षा मोठया मोटर्सच्या नियंत्रणाकरीता स्टाटर्सबाबत खालील प्रमाणे अ आणि ब पर्याय नमुद करावेत व समतुल्य समजावेत.

अ) ऑटोट्रान्सफार्मर स्टार्टर्स (यांत्रिकी दरसूची बाब क्र.10 जी) आणि मोटर प्रोटेक्शन रिले (यांत्रिकी दरसूची बाब क्र.10 के)

ब) सॉफ्ट स्टार्ट स्टार्टर्स (यांत्रिकी दरसूची बाब क्र.10 एच)

निविदांमध्ये स्वीकारार्ह असलेल्या स्टार्टर्सच्या यादीत वर उल्लेखिलेल्या सॉफ्ट स्टार्टर्सचा समावेश करावा.

राजेंद्र सगणे (सही)
( राजेंद्र सगणे )
सदस्य सचिव (तांत्रिक)

M. J. P.
ISSUED
11 JAN 1999
MUMBAI-21.

प्रत
अपर मुख्य सचिव, पा.पु.व स्व.विभाग मंत्रालय मुंबई.
प्राधिकरणाचे सर्व तांत्रिक सदस्य
विशेष कार्य अधिकारी, म.जी.प्रा. ठाणे
सर्व मुख्य अभियंता
सर्व अधीक्षक अभियंता
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा.नवी मुंबई.
अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)
सर्व कार्यकारी अभियंता
सर्व कार्यकारी अभियंता (यांत्रिकी)
तांशा-9 / परिपत्रक फाईल / मास्टर फाईल.